आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

११ जुलै २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची देशातल्या नामांकित अर्थतज्ज्ञांशी चर्चा

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार

- नीट यूजी परीक्षा पेपर फुटी प्रकरणी तपासाचा सीलबंद अहवाल सीबीआयकडून सर्वोच्च न्यायालयात सादर

- ‘बिमस्टेक’ देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची दुसरी परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरू

**आणि**

- ब्रावो ओपन चॅलेंजर टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरी प्रकारात भारताचा एन श्रीराम बालाजी आणि इक्वेडोरचा गोन्सालो एस्कोबार या जोडीचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत देशातल्या नामांकित अर्थतज्ज्ञांशी संवाद साधत आहेत. आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत ते या अर्थज्ज्ञांची मतं आणि सूचना जाणून घेत आहेत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन  नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी आणि इतर सदस्यही या बैठकीत उपस्थित आहेत.

**<><><><><>**

रशिया आणि ऑस्ट्रियाच्या तीन दिवसीय दौऱ्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल भारतात परतले. या दौऱ्यात मोदी यांनी आधी मॉस्को आणि नंतर व्हिएन्नाला भेट दिली. दोन्ही देशांच्या प्रमुखांशी त्यांनी महत्वाच्या विषयांवर द्विपक्षीय चर्चा केली.

भारत-ऑस्ट्रिया यांच्यातले संबंध धोरणात्मक दिशेनं पुढं नेण्याचा निर्णय दोन्ही नेत्यांनी घेतल्याचं नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रिया भेटीनंतर सांगितलं. ही युद्धाची वेळ नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला, तसंच युक्रेन आणि पश्चिम आशियासह विविध संघर्षांबाबत सविस्तर चर्चा झाल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. गेल्या ४१ वर्षांतला भारतीय प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच ऑस्ट्रिया दौरा होता.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार आहेत. आपल्या मुंबई दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी उद्या ते नरसी मोनजी मॅनेजमेन्ट स्टडीज संस्थेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

**<><><><><>**

मुंबईच्या परळ भागातल्या बी. आय. टी. चाळीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं दीर्घकाळ वास्तव्य असल्यानं तिथे त्यांचं भव्य स्मारक उभारण्यासाठी सरकारची भूमिका सकारात्मक आहे, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी आज महाराष्ट्र विधानपरिषदेत दिली. या चाळीत अद्याप काही लोक राहत असून त्यांचं पुनर्वसन झाल्यावर स्मारकाचं काम पुढे नेण्यात येईल, असंही त्यांनी नमूद केलं.

इंदू मिल परिसरातही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं स्मारक उभारण्याचं काम वेगानं सुरू आहे. त्यांचा भव्य पुतळा उभारण्यास लागणारा वेळ सोडता उर्वरित काम पुढच्या वर्षी पूर्ण होईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला दिलं.

पुण्याच्या कल्याणीनगर भागात मे महिन्यात झालेल्या पोर्श कार अपघात प्रकरणाच्या तपासात पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अतिशय तत्परतेनं काम केलं आहे, यात कुठेही निष्काळजीपणा झालेला नाही, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत स्पष्ट केलं.

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आत्तापर्यंत १ लाख ७३ हजार २७२ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ११ हजार ७८८ ग्राहकांनी ४९ पूर्णांक२२ शतांश मेगावॅट क्षमतेची सोलर रूफटॉप यंत्रणा इन्व्हर्टरसहित बसवण्यात आलेली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**<><><><><>**

देशाला २०२५ सालापर्यंत क्षयमुक्त करण्याच्या प्रयत्नात १८ वर्षांवरील सर्व व्यक्तींना क्षयरोगाची लस देण्याची मोहीम राज्यात राबवण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला होता. २०२२ साली राज्यात २ लाख ३३ हजार ८७२ क्षय रोग रुग्ण होते, तर मुंबईत ६५ हजार ४३२ क्षय रुग्ण होते, अशी माहिती देखील मंत्री सावंत यांनी दिली.

अंगणवाड्या उभारणी, दुरुस्ती यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव करण्यात येईल, अशी माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. याबाबतचा मोनिका राजळे यांनी प्रश्न  उपस्थित केला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखं येत्या १९ जुलै पासून साताऱ्यातल्या सरकारी संग्रहालयात ठेवली जातील. यावेळी शिवाजी महाराजांच्या शस्त्रास्त्रांचं प्रदर्शनही भरवलं जाणार आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत दिली.

**<><><><>**

पंधराव्या कृषी नेतृत्व समिती २०२४ चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काल नवी दिल्लीत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २१ लाख हेक्टरवर झाडं लावण्याच्या तसंच पाच टक्के बायोमास वापरण्याचा निर्णय राज्यानं घेतल्याची माहिती दिली. पीक विमा योजनेत महाराष्ट्र अग्रेसर असल्याचं सांगत सिंचन प्रकल्पाद्वारे १७ लाख हेक्टर सिंचन क्षमतेचं ध्येय निश्चित केल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाचा तिसरा टप्पा आज सकाळी सात वाजल्यापासून खुला झाला. सोमवार ते शुक्रवार सकाळी सात ते रात्री अकरा या वेळेत हा टप्पा वाहतुकीसाठी खुला राहील. प्रकल्पातल्या उर्वरित कामांच्या पूर्ततेसाठी तो

शनिवार आणि रविवारी  बंद राहील. उत्तर मार्गिकेवरच्या हाजी अली ते खान अब्दुल गफार खान मार्गापर्यंतच्या सुमारे साडेतीन किलोमीटर अंतराच्या या टप्प्याची पहाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केली. मुंबईतली वाहतूक समस्या सोडवण्यासाठी किनारी रस्ता प्रकल्प मोलाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

नीट यूजी परीक्षा पेपर फुटी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयला आतापर्यंत झालेल्या तपासाची माहिती देण्याची सूचना ८ जुलै रोजी दिली होती. तो अहवाल आज सीबीआयनं सील बंद लिफाफ्यात  न्यायालयासमोर सादर केला. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात १८ जुलै रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

**<><><><><>**

‘बिमस्टेक’ देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची दुसरी परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरू होत आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर या परिषदेच्या अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. ही दोन दिवसीय शिखर परिषद, बिमस्टेक गटातल्या देशांमध्ये संरक्षण, कनेक्टिविटी, व्यापार, गुंतवणूक या क्षेत्रांमधल्या सहकार्याच्या दृष्टीनं महत्वाची आहे. बंगालच्या खाडी क्षेत्रातल्या भारत, श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार, थायलंड, नेपाळ आणि भूतान या राष्ट्रांमध्ये तंत्रज्ञान आणि आर्थिक बाबतीत बहुस्तरीय सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने बिमस्टेक हा राष्ट्रगट कार्यरत आहे.

**<><><><><>**

पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीनं मुंबईतल्या वडाळा इथं २९ आणि ३० जून रोजी झालेल्या राज्यस्तरीय सीनियर इक्विप स्पर्धेत ज्येष्ठ क्रीडा पत्रकार सुहास जोशी, खेळाडू विजया नर आणि विलास दळवी यांना जीवन गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये, कठुआ हल्ल्यात सहभागी झालेल्या दहशतवाद्यांचा शोध आज चौथ्या दिवशीही सुरू आहे. आतापर्यंत २० हून अधिक जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे. घनदाट जंगलात अधूनमधून मुसळधार पाऊस आणि धुके असतानाही कठुआ, भदरवाह आणि उधमपूर भागात मोठ्या प्रमाणावर शोधकार्य सुरू आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये गेल्या तेरा वर्षांपासून अवैधरित्या राहत असणाऱ्या परकीय नागरिकांना शोधण्यासाठी प्रशासनाने सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या नागरिकांना त्यांच्या मूळ देशात परत पाठवणं आणि अवैध स्थलांतर रोखणं हा यामागचा हेतू आहे.

<><><><><>

आसाममध्ये आलेल्या पुरात गेल्या २४ तासांत आणखी पाच जणांचा मृत्यू झाला असून पुरातल्या बळींची एकूण संख्या ८४ झाली आहे. राज्याच्या २७ जिल्ह्यांमधे १४ लाखांहून अधिक लोकांना पुराचा फटका बसला आहे. अडीच हजार गावं आणि ३९ हजार हेक्टरपेक्षा अधिक शेत जमिनीचं नुकसान पुरामुळे झालं आहे.

**<><><><><>**

ब्रावो ओपन चॅलेंजर टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरी प्रकारात भारताचा एन श्रीराम बालाजी आणि त्याचा सहकारी असलेला इक्वेडोरचा गोन्सालो एस्कोबार यांनी काल संध्याकाळी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या जोडीने बोलिव्हियाच्या बोरिस एरियास आणि फेडेरिको झेबॉलस यांचा ६-३, ६-० अशा सरळ सेटमध्ये पराभव केला. आज होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीत त्यांचा सामना ब्राझीलचा मार्सेलो डेमोलिनर आणि अर्जेंटिनाच्या गिर्लेमो दुरान यांच्याशी होईल.

**//<><><><><>//**